Estd: 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन दि.१८ नोव्हेंबर २०२० रोजी सपंन्न होत आहे. दि.२७ ऑक्टोबंर,२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कोवीड–१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे यावर्षी विद्यापीठ वर्धापन दिन कार्यक्रम खालील प्रमाणे आयोजित करण्यात आलेला आहे.

१. दि.१८ नोव्हेंबर २०२० रोजी विद्यापीठ वर्धापन दिन साजरा होत आहे. त्या निमित्ताने सदर दिवशी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठ प्रांगणात **मा. कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे.** या समारंभास विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक वर्ग यांनी उपस्थित रहावे. यावेळी उपस्थितांनी कोवीड–१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या, विद्यापीठाच्या मार्गदर्शक नियमांचे पालन करावे. (मास्क, सामाजिक अंतर इं.)

२. सद्या विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरू असलेने सर्व परीक्षांचे निकाल जाहिर झालेनंतर शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेल्या पाल्यांना व शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधीमधून सदस्यांच्या पाल्यांना प्रमाणपत्र व बक्षीस पाठविण्याची कार्यवाही करण्यात यईल. याबाबत सविस्तर माहिती परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल.

३. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे होणारे इतर सर्व कार्यक्रम कोवीड–१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे यावर्षी रद्द करण्यात आलेले आहेत.

४. दि.१८ नोव्हेंबर,२०२० रोजी वर्धापन दिन रोजी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते ११.३० अशी राहील, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 1759
दिनांक – 10 NOV 2020

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. मा. कुलगुरु, मा. कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन, व मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास
३. **अभियांत्रिकी विभाग** – अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधिताना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तभांची स्वच्छता व वरील कप्पीची सुस्थिती पहावी. विद्यापीठ परीसरातील सर्व पुतळयांची देखभाल व स्वच्छता पहावी. तसेच पुतळयांना पुष्पहार अर्पण करणेकामी उद्यान विभागास आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून ध्यावी.
४. **अभियांत्रिकी विद्युत विभाग** – सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक तेथे ध्वनीक्षेपकाची तसेच, लाईट ची व्यवस्था करावी.
५. **सुरक्षा विभाग** – प्रमुखांनी ध्वजारोहणप्रसंगी ध्वज हाताळणीसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी व परेडची व्यवस्था करावी.
६. **विद्यार्थी विकास विभाग**– सदर दिवशी प्रचलित पध्दतीने ध्वजारोहण कार्यक्रमाचे नियोजन करावे.
७. **संगीत अधिविभाग** – विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांनी सदरच्या कार्यक्रमावेळी स्वागत गीत व पसायदान गायनाची व्यवस्था करावी.
८. **वाहन विभाग** – विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांचे सुचनेनुसार त्यांना वाहन उपलब्ध करून द्यावे.
९. **उद्यान विभाग** – सदर दिवशी विद्यापीठ परिसरातील सर्व पुतळयांना पुष्पहार अर्पण करण्याची कार्यवाही करावी.
१०. श्री डी. आर. चौगुले व श्री. एस. बी. डोंगळे, जमादार यांनी समारंभावेळी आवश्यक ती सर्व तयारी करणे (रेड कारपेट, मॅट अंथरणे व काढणे व इतर अनुषांगीक कामकाज)
११. **इंटरनेट विभाग**– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

टीप– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, यांच्या निदर्शनास आणून सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबद्दल सूचना द्यावी.